


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/भांडार/K- 03 / 1466 दिनांक :- 24.04.2026

24 APR 2026

प्रति,

व्यवस्थापक,

----------------------------

----------------------------

**विषय :** इ.10 वी व इ.12 वी फेब्रु-मार्च 2026 व जून-जुलै 2026 परीक्षेच्या उत्तरपत्रिका व पुरवणी उत्तरपत्रिका झेरॉक्स (छायांकित) प्रती काढणे व स्कॅनिंग करून पाठविणे.

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय मंडळातील इ.10 वी व इ. 12 वी फेब्रु-मार्च 2026 व जून-जुलै 2026 परीक्षेच्या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार परिशिष्ट `अ' मध्ये नमूद उत्तरपत्रिका व पुरवणीच्या छायांकित प्रती कार्यालयात मशीन ठेवून झेरॉक्स काढणे तसेच परिशिष्ट "ब" मध्ये नमूद उत्तरपत्रिका व पुरवणीच्या स्कॅनिंग करून विद्यार्थ्यांना E-Mail द्वारे पाठविणेसाठी दि.24.04.2026 ते दि.30.04.2026 च्या दु.4.00 वा पर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | झेरॉक्सचा तपशील | दर रुपये | दर पैसे |
|---|---|---|---|
| 1 | एक साईड झेरॉक्स पेपरसहित | | |
| 2 | दोन्ही साईड झेरॉक्स पेपरसहित | | |

**परिशिष्ट "ब"**

| अ.क्र. | तपशील | प्रति पृष्ठ दर रूपये सर्वकरासहित |
|---|---|---|
| 1 | इ.12 वी उत्तरपत्रिका 28 पानी व पुरवणी तसेच इ.10 वी उत्तरपत्रिका 20 पानी व पुरवणी इ. उत्तरपत्रिका ए-4 साईजमध्ये स्कॅन करून विद्यार्थ्यांना E-Mail द्वारे पाठविणे. | (अक्षरी.रु./पै. ) |

1. मंडळाकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या विषय निहाय उत्तरपत्रिका रोजच्या रोज स्कॅन करुन संबंधित विद्यार्थ्याला त्याने मागणी केलेल्या विषयांची PDF फाईल तयार करुन त्याने दिलेल्या E-Mail वर पाठविणे. (फाईल साईज 50 MB पर्यंत)
2. अत्याधुनिक स्कॅनर मशीन व पीसी मंडळ कार्यालयात उपलब्ध करुन देणे, त्यामध्ये एक उत्तरपत्रिका व एक विषय अशी एकच फाईल तयार करणे
3. रु.500/- च्या स्टॅपपेपरवर करारनामा करुन देण्याची जबाबदारी आपली राहिल.

4. सदरचे मशीन चालविण्यासाठी कुशल कामगार नेमणे आवश्यक राहील. तसेच तांत्रिक बिघाडामुळे मशीन बंद पडल्यास त्वरित पर्यायी मशीन उपलब्ध करुन काम सुरु ठेवणे आवश्यक राहील.
5. सदर काम गोपनीय व कालमर्यादित असल्याने कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या जागेत सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 पर्यत कार्यालयात उपस्थित राहून काम पूर्ण करणेचे आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास सुट्टी दिवशी सकाळी 9.00 ते 3.00 पर्यत कामकाज करावे लागेल.
6. आपणास झेरॉक्स, स्कॅनिंगसाठी देण्यात येत असलेल्या उत्तरपत्रिका व पुरवणी हा अत्यंत गोपनीय दस्तऐवज आहे. त्या संबधीची गोपनीयता भंग होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.
7. झेरॉक्स, स्कॅनिंगसाठी इ.10 वी व इ.12 वी गोपनीय शाखेतून देण्यात येणाऱ्या प्रकरणे (केसेस) ची देवघेव रजिस्टरमध्ये नोंदी ठेवणे अनिवार्य राहील.
8. इ.10 वी व इ.12 वी गोपनीय शाखेतील शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनानुसार झेरॉक्स कॉपी व स्कॅनिंग संबधीचे काम करावयाचे आहे.
9. सदर कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य यांची वाहतूक आपण स्वत: करावयाची आहे.
10. सदर कामासाठी ऑफिसकडून जागा व वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि नेटचे कनेक्शन आपले राहिल.
11. निविदा पुर्णत: अगर अंशत: स्विकारणे अगर पूर्णत: नाकारणे याचा अधिकार मंडळाने राखुन ठेवलेला आहे. याबाबतचा मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
12. निविदा प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार विभागीय मंडळाने राखुन ठेवलेला आहे.
13. कराराच्या कालावधी दरम्यान उपरोक्तकामा संदर्भात जर काही वाद / तंटा उद्भवल्यास तो फक्त कोल्हापूर येथील न्यायालयाच्या (कोर्टाच्या) कार्यकक्षेतच चालेल.
14. देयक सादर केल्यानंतर नियमानुसार TDS/GST TDS रक्कम वसूल करण्यात येईल.

आपले दरपत्रक त्वरित कार्यालयास सादर करावे.

(अनुराधा म्हेत्रे)
**प्र. विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**